# प्रेस नोट

जा.क्र.  /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय,भंडारा
दिनांक:- ७.११.२०१७

## खुनाचे प्रयत्नाचें गुन्हयात आरोपीस आजन्म सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा

पो.स्टे. गोबरवाही अंतर्गत ग्राम बघेडा येथील घटणा असुन यातील तक्रारदार नामे नरेंद्र गजानन बोपचे, वय ३६ वर्ष रा. बघेडा ह.मु. डोंगर्ला याने पो.स्टे. गोबरवाही येथे दिनांक २६.०१.२०१५ रोजी तक्रार दिली की, ग्राम बघेडा येथे तक्रारदाराची काकी नामे भागरताबाई व लहान बहीन आशा राहत असुन आशा हिचे गावातीलच चंद्रशेखर कटरे याचे सोबत प्रेमविवाह झाला होता काही दिवसानी चंद्रशेखर याने आशा हिस सोबत न वागवता इतर महिलेशी विवाह केला त्यामुळे आशा हि आपली आई भागरताबाई व चंद्रशेखर पासुन झालेला मुलगा यांचेसह राहत होती. आरोपी नामे चंद्रशेखर कटरे हा नेहमी तक्रारदाराची बहीन व आई यांना घरी जावुन शिवीगाळ व मारहान करीत होता घटणा रोजी फिर्यादी हा डोंगर्ला येथे हजर असता बघेडा येथिल फिर्यादीचे हितचीकांनी रात्री ९.३० वा. त्यास फोन करून सांगीतले की, आरोपी नामे चंद्रशेखर कटरे याने तुझी काकी व तुझे बहीनीस त्यांचे झोपडीत घुसुन कोयत्याने, चाकुने हातावर, मानेवर, तोडावर, पाठीवर मारून गंभिर जख्मी केले आहे त्या रक्ताच्या थारोडयात पडल्या असुन बेशुध्द पडलेल्या असल्याने त्यांना सरकारी दवाखाण्यात तुमसर येथे घेुवन जात आहे. सदर माहिती वरून तक्रारदार हा तुमसर रूग्नालयात पोहचला असता त्याला त्याची काकी व बहीन गंभिर जख्मी अवस्थेत दिसल्या त्यांचे चेहऱ्याला, डोक्याला, मानेला गंभिंर जख्मा होत्या त्यावरून तक्रारदार याने पोलीस स्टेशन येथे गोबरवाही येथे तक्रार दिली सदर तक्रारीवरून आरोपी नामे चंद्रशेखर कटरे याचे विरूध्द कलम ३०७ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास सहा. पोलीस निरिक्षक मनोज सिताराम वाढीवे, पो.स्टे. गोबरवाही यांनी केला तपासात आरोपीस दिनांक २७.०१.२०१५ रोजी अटक केली व तपास केला गुन्हयात अंतिम तपास सपोनि राजेंद्र वडयाळकर यांनी पुर्ण करून आरोपी विरुध्द जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दोषारोपपत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुणावणी मा. सत्र न्यायाधिश आर. पी. पांडे सा. यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट दुर्गा तलमले**, सहा. सरकारी अभियोक्ता सत्र न्यायालय, भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन ११ साक्षदार तपासले. आज दि. ७.११.२०१७ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवन आरोपीने पिडितांना जिवे ठार मारण्याचे उद्देशानेच हल्ला केल्याचे सिध्द झाल्याने गुन्हयात आरोपी नामे चंद्रशेखर रामचंद्र कटरे, वय ३९ वर्ष रा.बघेडा यास कलम ३०७ भादवि अन्वये दोषी ठरवुन **आजन्म सश्रम कारावास व ५,०००/-रुपये दंड, दंड न भरल्यास तिन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली,** सदर गुन्हयात सहाय्यक पोलीस निरीक्षक, किशोर झोटींग यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार शामकुमार निखाडे, ब.न. ४१३ व पो.ना. ओमप्रकाश डीवटे, ब.नं. ९५६ पो.स्टे. गोबरवाही यांनी पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(राजेंद्र आर. नागरे)
प्र.पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी क्र.०७१८६-२५४७०१

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.